6th April, 2026

Department of Corporate Services,
BSE Limited
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai-400001

**Scrip Code –533018**

Subject: **Disclosure under Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015- Newspaper advertisement -Special Window for Transfer and Dematerialisation of Physical Securities**.

Dear Sir/Madam,

Please find enclosed herewith copies of the Newspaper advertisements by the Company, informing physical Shareholders about the Special Window for re- lodgement of transfer requests of physical Shares, in accordance with the SEBI Circular No. HO/38/13/11(2)2026-MIRSD-POD/I/3750/2026 dated January 30, 2026, in the following newspapers:

a. Financial Express - English newspaper and
b. Mahasagar Akola - Marathi newspaper

The same is being made available on the website of the Company at https://simplex-group.com.

This is for your information and record.

Thanking You,

**Yours faithfully,**
**For Simplex Mills Company Limited**

KALYANI GAURISH NATEKAR
Digitally signed by KALYANI GAURISH NATEKAR
Date: 2026.04.06 13:23:21 +05'30'

**Kalyani Natekar**
**Company Secretary & Compliance Officer**
**Membership No- A43341**



६ एप्रिल भाजपा स्थापना दिवसानिमित्त भाजपा कार्यालयात आकर्षक लाइटिंग व झेंडा

## सम्राट अशोक जयंतीनिमित्त ३५०० स्वेअर फुटाची भव्य रांगोळी,अनोखा उपक्रम



**अकोला :** सम्राट अशोक यांच्या २,३३० व्या जयंतीचे औचित्य साधून शहरात लक्षवेधी उपक्रम राबवण्यात आला. तिक्ष्णगत मल्टिपरपझ वेलफेअर सोसायटी, अकोलाच्या पुढाकाराने पंचशील नगर व न्यू तापडिया नगर, खरप रोड परिसरातील चक्रवर्ती सम्राट अशोक प्रवेशद्वारासमोर ३५०० स्केअर फूट क्षेत्रफळाची भव्य रांगोळी साकारण्यात आली.नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. या आकर्षक रांगोळी द्वारे सम्राट अशोक यांचे जीवनकार्य, बौद्ध धम्माच्या प्रसाराची तसेच शांतता, अहिंसा आणि मानवतेचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला. आकर्षक रंगसंगती आणि कलात्मकतेचा संगम असलेल्या या रांगोळीने परिसरात औत्सुक्यनिर्माण केले. स्थानिक नागरिक, तरुणाई आणि महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले. अनेकांनी रांगोळीसमोर छायाचित्रे काढत या कलाकृतीचा आनंद घेतला. मोठ्या स्क्रीनवर ड्रोन द्वारे रांगोळीचे प्रेझेंटेशन करण्यात आले. शनिवारी रात्री उशिरापर्यंत कार्यक्रम सुरू होता. समाजात थोर व्यक्तीविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सांस्कृतिक मूल्ये जपणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. अशा उपक्रमांमुळे शहरातील सामाजिक एकात्मता अधिक दृढ होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# कौलखेड परिसरात तांडव करणारे पाच अटकेत

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

शनिवारी दुपारी कौलखेड परिसरात तांडव गँग च्या सहा युवकांनी तीन ठिकाणी सशस्त्र हल्ला करीत तिघांना गंभीर रित्या जखमी केले या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली असून महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन दुचाकीवरून आलेल्या सहा तरुणांच्या टोळकयाने वेगवेगळ्या भागांतील तीन तरुणांवर धारदार शस्त्रांनी हल्ला केल्याने कौलखेड परिसरात घबराट पसरली, ज्यात तीन जण गंभीर जखमी झाले. हल्लेखोर हे कौलखेड परिसरातील 'तांडव गँग'चे सदस्य असल्याचे सांगितले जात असून, पोलीस त्यांचा सक्रियपणे शोध घेत आहेत. प्राथमिक माहितीनुसार, हल्लेखोरांमध्ये काही अल्पवयीन मुलांचाही समावेश होता. हल्लेखोर अमली पदार्थांचे व्यसनी असल्याचे म्हटले जात आहे. तांडव गँगच्या या गुंडगिरीमुळे पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कौलखेड चौक परिसरातील रहिवासी रवीकिरण गजानन ठाकरे हे त्यांच्या सर्विस सेंटरवर दुचाकी ध्रुवत असताना, एका दुचाकीवरील चार आणि दुसऱ्या दुचाकीवरील दोन तरुणांनी त्यांच्यावर हल्ला केला, ज्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. रवी किरण ठाकरे यांच्यावर झालेल्या या अचानक हल्ल्यामुळे



परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या टोळीची दहशत एवढ्यावरच थांबली नाही तर त्यांनीअभिलाष हिंगे यांच्यावर हल्ला करून त्यांना जखमी केले. त्यानंतर, काही तासांतच, या टोळीतील सदस्यांनी एका कॅफेवर हल्ला करीतहरिओम रोठे नामक तरुणास जखमी करून पळ काढला. माहिती मिळताच, खदान पोलिस घटनास्थळी दाखल झाले. आणि घटनास्थळावरील तसेच आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून हल्लेखोरांचा कसून शोध सुरू केला. घटनेची गांभीर्याने दखल घेत एसडीपीओ पथक, खदान पोलीस स्टेशन पथक आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पथकांनी आरोपींचा तपास सुरू केला होता आरोपी हे अटक चुकवण्याकरता खडकी शेत शिवार तालुका बार्शीटाकळी या परिसरात लपून बसले होते त्यामुळे त्यांना शोधणे आव्हानात्मक झाले होते तरीसुद्धा एलसीबीच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण गोपनीय माहितीच्या आधारे नमूद आरोपींचा शोध लावून त्यांना ताब्यात घेतले त्यांच्या ताब्यातील तीन मोटरसायकली जप्त करण्यात आल्या अटक केलेल्या आरोपींमध्ये १) १८ वर्षीय कबीर सुनील बलखंडे राहणार न्यू घेता नगर, २) धनंजय संदीप ढाले व १९ वर्षे राहणार टीटीएम कॉलेज जवळ अकोला, ३) शिवम उर्फ शुभम संजय शेळके व १९ वर्षे राहणार हिंगणा नाका जवळ अकोला, ४) गौरव सुनील चव्हाण वय २० वर्षे राहणार खडकी तालुका बार्शी टाकळी, ५) एक विधी संघर्षग्रस्त बालक यांचा समावेश असून काही आरोपींवर यापूर्वीसुद्धा गुन्हे दाखल आहेत पुढील कारवाई करता सर्व आरोपींना पोलीस स्टेशन खदान यांच्या ताब्यात देण्यात आले या घटनेत सामील असलेल्या विधी संघर्षग्रस्त बालकाच्या पालकांना सूचना देऊन चौकशी कामी बोलवण्यात येणार आहे तसेच जरी अल्पवयीन असते तरी जे जे एक्ट नुसार माननीय न्यायालयाला तपास अधिकारी कडून त्यांचे विरुद्ध प्रौढ म्हणून खटला दाखल करण्याची विनंती केली जाईल.

### या हल्ल्यांमागे जुने वैर हे कारण आहे

**मिळालेल्या माहितीनुसार, अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या तांडव गँग च्या सदस्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे, काही महिन्यांपूर्वी तिथल्या नागरिकांनी त्यांना मारहाण करून परिसरातून धिंड काढली होती. या तरुणांवरील हे हल्ले याच वैराचा परिणाम असल्याचे मानले जाते. हल्लेखोरांच्या अटकेनंतरच त्यांच्या या धुमाकुळामागील खरे कारण उघड झाले आहे.**

## खऱ्या दिव्यांग बांधवांचा हक्क बाधित होऊ नये यासाठी काळजी घ्यावी : आ.रणधीर सावरकर



■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

दिनांक ४/४/२०२६ रोजी दिव्यांग बांधवांच्या विविध योजना,शासनाने नवीनच सुरु केलेले दिव्यांग सहायक पोर्टल, णऊखऊ कार्ड आधार शी लिंक करणे, तथा दिव्यांग प्रमाणपत्र तात्काळ उपलब्ध व्हावे या साठी लागणाऱ्या उपाय योजना भविष्यात येणाऱ्या अडचणी या सर्व समावेशक दिव्यांग बांधवांच्या संबंधित बाबींचा पूर्णतःआढावा हा प्रत्येक विभागातील जिल्ह्या पातळीवरील मुख्यअधिकाऱ्यां कडून बैठकी दरम्यान घेतला. सदर बैठकी मधूनच दिव्यांग बांधवांना असलेल्या तांत्रिक अडचणी निर्माण होण्या अगोदरच पूर्व नियोजन करणे अत्यवाश्यक असल्याचे या बैठकी मध्ये सूचना मा.आ.श्री रणधीरजी सावरकर यांनी संबंधित अधिकारी यांना दिल्या. अकोला जिल्ह्यातील ४५ हजार नोंदीत दिव्यांग बांधव असून त्यापैकी काही बोगस (खोटे )लाभार्थी असण्याची शंका असल्याचे अधिकारी यांनी स्पष्ट केले. सर्वात दुःखी असलेल्या खऱ्या दिव्यांग बांधवांचा हक्क बाधित होऊ नये यासाठी काळजी घ्यावी हि ताकीत व सूचना सर्व अधिकारी यांना यावेळी मा.आ.श्री रणधीरजी सावरकर यांनी दिल्या. दिव्यांग बांधवांची नोंदणी सेतू केंद्रामार्फत व्हावी, विविध मार्गदर्शन शिबीरांचे तथा मेळाव्यांचे चे प्रत्येक तालुका, ग्रामपंचायत स्थरावर आयोजन करण्यात यावेत जेणेकरून दिव्यांग बांधवांना दिलासा मिळेल.यावेळी दिव्यांग मंत्रालयाचे मंत्री महोदय ना.श्री अतुलजी सावे यांच्याशी फोन कॉल द्वारे दिव्यांग बांधवांच्या सेवेत अकोट दिव्यांग मंडळ तात्काळ सुरु करावे या बाबत चर्चा केली. त्यावर मंत्री महोदयांनी निश्चित लवकरच अकोट येथील सेंटर सुरु करण्यासाठी हिरवी झेंडी दिली.दिव्यांग बांधवांना मिळणारे संजय गांधी आर्थिक अनुदान हे ज्या दिव्यांगांनी आपले णऊखऊ कार्ड आधार शी लिंक केले, ज्यांचे दिव्यांग प्रमाणपत्र कायम आहेत.

## जवाहर नगर ते दूध डेरी रोडवर पाण्याचा पूर

**अकोला :** शहरातील जहाँ नगर रोड ते दूध डेरी रोड दरम्यान मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर वाहत असल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. मनपाच्या स्वच्छता विभागाच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजी नगर परिसरातील दूध डेरी रोडवरील गेटपासून पाणी वाहत वाहत संपूर्ण रस्त्यावर पसरले आहे. हे पाणी जवाहर नगर चौकापर्यंतच नव्हे तर पुढील भागातही मोठ्या प्रमाणात साचत वाहत असल्याचे दिसून येत आहे.रस्त्यावर सतत पाणी साचल्यामुळे वाहत असल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून पायी चालत असनारे विद्यार्थी व मॉर्निंग वाकला जाणारे नागरिक घसरून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. तसेच, जवाहर नगर रोडवरील व्यापाऱ्यांनाही या परिस्थितीचा फटका बसत असून ग्राहकांची ये-जा कमी झाल्याने आर्थिक नुकसान होत आहे. स्थानिक नागरिकांनी स्वच्छतेबाबत अनेकदा तक्रारी करूनही मनपाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, अशी नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तात्काळ या समस्येकडे लक्ष देऊन पाणी निचरा करण्याची व्यवस्था करावी.

## श्री क्षेत्र श्रद्धासागर आकोट येथे बालसंस्कार शिबिराचे आयोजन

■अकोट,दि.५ (प्रतिनिधी)■



श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट व्दारा दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुध्दा दि. १ मे ते ३० मे दरम्यान श्री क्षेत्र श्रध्दा सागर, आकोट येथे सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. बालसंस्कार शिबिरांचे आद्यजनक श्री संत वासुदेव महाराज यांनी बालसंस्कार शिबिरांचे सन १९३९ पासून गावोगावी आयोजन करून संस्कार रुजविले आहेत. त्यांनी दाखविलेल्या मार्गाचे स्मरण करीत संस्था प्रतिवर्षी बालसंस्कार शिबिराचे आयोजन करीत आहे.

या बालसंस्कार व सर्वांगीण विकास शिबीरामध्ये तज्ञ मार्गदर्शक तथा शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. या निवासी शिबीरासाठी विद्यार्थी प्रवेश मर्यादित आहेत. प्रथम येण्या-या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. प्रवेश निशुल्क राहील. शिबिरात आध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक, ज्ञान- विज्ञान, संगणक प्रशिक्षण, योगासने, व्यायाम, प्राणायाम, मनोरंजन, संगीत, खेळ व कला विषयक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात १२ वर्षावरील फक्त मुलांना प्रवेश मिळणार आहे, असे श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट व्दारा कळिवण्यात आले आहे.

### बाल वैष्णवांकरिता अन्नदानाचे आवाहन

**शिबिरातील आध्यात्मिक शिक्षण घेणाऱ्या बाल वैष्णवांकरिता विविध सेवा सुविधा श्री संस्थेद्वारा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामध्ये भोजन व्यवस्था, निवास व्यवस्था, ग्रंथ तथा शैक्षणिक साहित्य, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, तज्ञ मार्गदर्शक प्रबोधन, इत्यादी सुविधा उपलब्ध होत आहेत. हे शिबिर ३० दिवसांचे असल्याने सकाळ फराळ, सकाळचे भोजन, सायंकाळचे भोजन अशा एकूण ९० पंगतांची आवश्यकता आहे. तरी, या अन्नदान सेवेकरिता आपण सढळ हाताने सहकार्य करून श्रींची सेवा करावी, असे आवाहन श्री संस्थेद्वारा करण्यात येत आहे.**

## थोडक्यात

### वातावरणातील बदल प्रकृतीसाठी अयोग्य

**अकोला:** ऐन उन्हाळ्यात पाऊस होत आहे. हवामानात झालेला बदल प्रकृतीच्या तक्रारी वाढवत आहे. अंगदुखी, डोकेदुखी, ताप अशी लक्षणे जाणवत आहे. तसेच सर्दी, खोकला देखील त्रस्त करीत आहे.शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात रूग्ण मोठ्या प्रमाणात दिसून येतात. मध्ये ४२ अंश सेल्सिअस पर्यंत पारा पोहोचला. आणि आता पावसाळी वातावरण तयार झाले आहे. दररोज सायंकाळी पावसाची शक्यता असते.आणखी काही दिवस अशी स्थिती राहील अशी शक्यता आहे.

### अभिलाष तायडे युवक काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी

**अकोला :** महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या नव्या कार्यकारिणीत अकोल्यातील युवा नेतृत्वाला मोठी संधी मिळाली असून, अभिलाष तायडे यांची जनरल सेक्रेटरीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे अकोल्याचा राजकीय आवाज आता थेट राज्य पातळीवर पोहोचणार असल्याचे मानले जात आहे.संघटनात्मक बांधणी, आक्रमक भूमिका आणि युवकांमध्ये मजबूत पकड यामुळे तायडे यांच्यावर पक्ष नेतृत्वाने विश्वास दाखवला आहे. गेल्या काही वर्षांत त्यांनी तळागाळातील कार्यकर्त्यांना जोडत युवकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला आहे. नवीन कार्यकारिणीत विविध पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या.

## जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील पोलीस पथकांनी ७५ ठिकाणी कारवाईमध्ये ८ लाख २९३२ रू चा मुद्देमाल जप्त

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

पोलीस दलामार्फत जिल्ह्यातील अवैध गावठी दारू निर्मिती व विक्री करणार्या विरुद्ध 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. पोलीस अधीक्षक श्री. अचिंत चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ०३.०४.२०२६ चे सकाळी १२.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत ही मोहीम प्रभावीपणे पार पडली.

या विशेष मोहिमेत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांतील पोलीस पथकांनी एकूण ७५ ठिकाणी कारवाई केली आहे. कारवाई दरम्यान देशी दारू च्या ४६ केसेस २०३५६२ तसेच गावठी हातभट्टी दारू च्या २९ केसेस ५९९३७० चा मुद्देमाल असा एकूण ७५ केसेस सुमारे ८०२९३२ /- रुपये किमतीचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला, तर अवैध धंद्यात सामील असलेल्यांवर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.अवैध गावठी दारू उत्पादनामुळे जनतेच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होवुन व शांतता भंग होते. या पार्शवभूमीवर अकोला पोलिस दलाने अशा अवैध धंद्यावर कठोर कारवाई करताना जनतेचा विश्वास कायम ठेवला आहे. पुढील काळात अशा प्रकारच्या अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी या पुढे सुध्दा नेहमी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने कळिवले आहे.

अवैध देशी तसेच गावठी दारू विरोधातील ही मोहीम सुरूच राहणार असून, नागरिकांनी अशा प्रकारच्त्या बेकायदेशीर अवैध दारू विक्री व निर्माण करणाऱ्यां विषयी माहिती असल्यास जवळच्या पोलीस ठाण्यात कळवावे. अकोला पोलीस दल सज्ज आहे. कोणताही अनुचित प्रकार आढळून आल्यास तात्काळ पोलीसांशी संपर्क साधावा असे आवाहन अकोला पोलीस दलाकडून करण्यात येत आहे.

## शिवसेना उपनेते तथा अकोला संपर्कप्रमुख आमदार राजन साळवी यांची शिवसेना जिल्हाप्रमुख श्रीरंग दादा पिंजरकर यांच्या कार्यालयाला सदिच्छा भेट

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

शिवसेनेचे नवनियुक्त अकोला लोकसभा संपर्कप्रमुख शिवसेनेचे उपनेते तथा माजी आमदार श्री राजन साळवी साहेब यांनी आज नियुक्तीनंतर प्रथमच अकोला दौऱ्यावर आले असता शिवसेनेचे जुने जाणते जिल्हाप्रमुख श्रीरंग दादा पिंजरकर यांच्या जिल्हा कार्यालयाला सदिच्छा भेट देऊन दिवसभर झालेल्या बैठकी व जिल्हा संघटने संदर्भात सविस्तर चर्चा करून आढावा घेतला. सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन क्षमतेनुसार जबाबदाऱ्या देण्यात येतील व संघटना मजबूत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन यावेळी लोकसभा संपर्कप्रमुख माजी आमदार राजन साळवी साहेब यांनी दिले यावेळी अकोला पूर्व चे उपजिल्हाप्रमुख गोपाल भाऊ म्हैसने योगेश अग्रवाल तालुकाप्रमुख विजय वानखडे तरुण बगेरे सागर भाऊ कुटे गोटू अग्रवाल महेश भाऊ बगेरे रमेश भाऊ तुकेकर सतीश भाऊ गोपनारायण पप्पू भाऊ चौधरी फिरोज पठाण नरेंद्र पुनकर दिनेश खाडीकर अशोक पाटील सरप कैलास



अमृतकर टोणी जयराज आकाश वक्ते संतोष सोनकुसरे मायाताई गव्हाळ राणी औलाद इराणी सह मोठ्या प्रमाणावर शिवसैनिक उपस्थित होते.

## भारतीय जनता पक्षाच्या ४६ व्या स्थापना दिवसानिमित्त जिल्ह्यात प्रत्येक घरावर भाजपाचा झेंडा

### ६ एप्रिल ते १२ एप्रिल पर्यंत जनसंवाद सप्ताह साजरा करण्यात येणार

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

भारतीय जनता पक्षाच्या ४६ व्या स्थापना दिवसानिमित्त अकोला महानगर आणि जिल्ह्यात वाढदिवसाच्या घरांवर भाजपचा झेंडा फडकून ६ एप्रिल ते १२ एप्रिल पर्यंत जनसंवाद सप्ताह साजरा करण्यात येईल अशी माहिती जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, जयंत मसने यांनी दिले. अकोला महानगर आणि जिल्ह्यात भाजपाच्या ४६ व्या स्थापना दिवसानिमित्त २५००० भाजपाच्या कार्यकर्त्यांच्या घरावर हितचिंतकांच्या घरात वर भाजपचा झेंडा आमदार रणधीर सावरकर, पालकमंत्री



एडवोकेट आकाश फुंडकर खासदार अनुप धोत्रे आमदार हरीश पिंपळे आमदार प्रकाश भारसाकळे आमदार वसंत खंडेलवाल विजय अग्रवाल, महापौर शारदा खेडकर, नगराध्यक्ष हर्षद साबळे वैशालीताई पालीवाल मायाताई घुले,, सौभाग्यवती सुलभाताई दुतोंडे, पवन महाले, अमोल गोगे, जयश्री पुंडकर, योगेश गोतमारे, कृष्णा चव्हाण, पुरुषोत्तम पानझाडे माधव मानकर राजेश नागमते, एडवोकेट रूपाली काकडे एडवोकेट देवाशिष काकड , अंबादास उमाळे संजय गोटफफोडे, तेजराव थोरात किशोर पाटील, यांच्या मार्गदर्शना चंद्रकांत अंधारे, डॉक्टर संजय शर्मा, गोपाल मोहोड, हरीश टावरी , गणेश रोठे, संकेत राठोड अशी ही माहिती शिवरकर मसने यांनी दिली.

SIMPLEX MILLS CO. LTD.
सिम्प्लेक्स मिल्स कंपनी लिमिटेड
CIN-L65900MH1998PLC116585
T: 2308 2951-54; Email: mills@simplex-group.com | Website: www.simplex-group.com

[illegible]

support@purvashare.com
company- mills@simplex-group.com

सिम्प्लेक्स मिल्स कंपनी लिमिटेडसाठी
सही/-
ठिकाण: मुंबई

महिलांच्या सर्वांगीण विकासाकरिता

# महिला मेळावा काळाची गरज : स्नेहल तराळे




■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

मराठा पाटील समाजातील महिलांमध्ये उच्चतम टॅलेंट आहे. महिलांनी उद्योगात सुद्धा चांगले यश संपादन केले आहे त्याची अनेक उदाहरणे आहेत. मराठा पाटील समाजातील महिलांनी धाडस करून उद्योगधंदे व्यवसाय उभारणे गरजेचे आहे.येणाऱ्या काळात घरातील एका व्यक्तीच्या उत्पन्नावर अवलंबून राहणे कठीण होणार असून आता महिलांनी छोटे-मोठे उद्योग करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन यशस्वी व्यावसायिका स्नेहश्री फॅशन हबच्या संचालिका स्नेहल तराळे यांनी केले महिलांच्या सर्वांगीण विकासाकरिता महिला मेळावे होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन पुढे बोलताना स्नेहल कराळे यांनी केले. त्या मराठा पाटील संघ बाळापूर वतीने मराठा पाटील संघटनेच्या भय्यूजी महाराज आश्रम निमकर्दा येथे आयोजित कौटुंबिक महिला मेळाव्यात बोलत होत्या. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती कुसुमताई किसनराव राऊत, जयश्री बाळासाहेब ताथोड उपस्थित होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुण्यतिथी निमित्त छत्रपती राजे शिवाजी व राष्ट्रमाता जिजाऊंच्या प्रतिमेस माल्या अर्पण व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचा आरंभ झाला. याप्रसंगी व्यासपीठावर रेखा राऊत, मालूताई पोहरे, मीनाक्षी नकासकर, सीमा वानखडे कांचन साबळे ममता इंगोले, कोकिळा माळी, ज्योती टाले, दिपाली मुरूमकर उपस्थित होत्या.

प्राध्यापक दिपाली घोगरे यांच्या बहारदार संचलन कार्यक्रमात महिलांच्या विविध स्पर्धा, सामान्य ज्ञान स्पर्धा, प्रज्ञावंत महिलांचा व विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच फॅशन शो, खेळ पैठणीचा आदी कार्यक्रम विविध क्षेत्रांच्या माध्यमातून घेण्यात आले खेळ पैठणीचा यामधील पैठण्या गुरुदेव ड्रेसचे संचालक मोहन सराफ यांच्या सौजन्याने देण्यात आल्या. याप्रसंगी मिस पाटील बाळापूर, मिसेस पाटील बाळापूर यांची निवड विविध स्पर्धांच्या माध्यमातून करण्यात आली यावेळी स्नेहल तराळे परीक्षक म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सांगता जिजाऊ वंदना करून करण्यात आली. याप्रसंगी सीमा वानखडे,गायत्री वानखडे,मीनाक्षी वानखडे,मालू ताई पोहरे,मोनिका लांडे, स्वाती पाटील उज्वला बढे,कोकिळा माळी, मीनाक्षी नकासकर,दीपाली घोगरे,सुचिता घोगरे,मेघा घोगरे,स्नेहल तराळे,गौरी काळे,पूजा काळे,रुपाली ठाकरे,ज्ञानेश्वरी माळी, प्रीती तायडे,उमा तायडे,गोकुळा तायडे,आशा तायडे,दीपाली मुरूमकार,उमा दांदळे,अशिका मुरूमकार,जान्हवी दांदळे,खुशी दांदळे,ज्योती ताले,प्रतिभा पाथ्रीकर,डॉ ममता इंगोले,विभा पाथरकर, अश्विनी काळे,जयश्री घोगरे,स्वाती माळी, योगिता लताड,संगीता माळी, सीमा निमर्ळ, गंगाताई भरणे दीपाली पारसकर,सुनीता वानखडे,श्रद्धा खेळकर, रूपाली लांडे,सौं. पारस्कार,रितिका लांडे विद्या साबळे मीना साबळे कु श्रद्धा साबळे नीता गावंडे,सौ उषा योगेश भटकर सौ रूपाली विवेक सरप सौ नेहा सचिन सरप सौ वैष्णवी सागर मानकर सौ मीराबाई जनार्दन गावंडेसौ वर्षा संतोष सरपसौ दिपाली शुभम मानकरऍड सविता खोटरे,ऍड प्रतिभा जाणोरकर ज्योती गावंडे पल्लवी वानखडे, अर्चना वानखडे संगीता जानोरकर,आदी महिलांसह बाळापुर तालुक्यातील प्रचंड संख्येने महिला उपस्थितीत होत्या.

# जिल्हा रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी ६ कोटींचा निधी मंजूर

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

केंद्र सरकारच्या पंतप्रधान लोकविकास कार्यक्रमा अंतर्गत अकोला जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला असून, दोन महत्त्वपूर्ण रूग्णालयांच्या बांधकामासाठी ६ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे अकोट येथील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय आणि शिवापूर येथील १०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाच्या रखडलेल्या कामाला आता मोठी गती मिळण्याची चिन्हे आहेत.शिवापूर येथील जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम गेल्या काही महिन्यांपासून निधीअभावी रखडले होते. मात्र, आता निधी प्राप्त झाल्याने हे काम युद्धपातळीवर पूर्ण केले जाईल, असा विश्वास जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांनी व्यक्त केला आहे. अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ११ मार्च २०२६ रोजी पाठवलेल्या पत्रानुसार, भारत सरकारच्या अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाच्या अधिकार समितीने या दोन्ही रुग्णालयांच्या प्रस्तावांना यापूर्वीच हिरवा कंदील दाखवला होता.

या प्रकल्पांसाठी एकूण १६३०.७८ लाख रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. या योजनेचे स्वरूप केंद्र आणि राज्य सरकारच्या ६०:४० अशा भागीदारीवर आधारित असून, यामध्ये केंद्र सरकारचा वाटा सर्वाधिक आहे. या नियोजनानुसार केंद्राचे ६ कोटी रुपये आणि राज्य सरकारचा २ कोटी ४० लाख रुपयांचा हिस्सा मुंबईयेथील आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या सहसंचालकांना (वित्त आणि प्रशासन) वितरित केला जाणार आहे. हे अधिकारी या प्रकल्पाचे मुख्य नियंत्रक आणि अंमलबजावणी अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळतील. केंद्र सरकारने आता प्रकल्प - आधारित निधी वितरणाची जुनी पद्धत बंद केली असून उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करून कामे वेळेत पूर्ण करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. या नवीन निधीमुळे अकोला जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांतील रुग्णांना सुसज्ज आणि दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध होणार असून, जिल्ह्याच्या आरोग्य पायाभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा अपेक्षित आहे.

# महसूल वसुलीचे शंभर टक्के उद्दिष्ट पार

■पातूर,दि.५ (प्रतिनिधी)■

नोंदणी व मुद्रांक विभागाकडून देण्यात आलेल्या महसूल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात सह दुय्यम निबंधक कार्यालय, पातूरने बाजी मारली आहे. आर्थिक वर्ष २०२५ - २६ साठी दिलेल्या ७ कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत ७ कोटी १३ लाख ६५ हजार रुपयांचा महसूल जमा करून कार्यालयाने १०१.९५ टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य केली आहे. या उल्लेखनीय यशात मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, ई-फायलिंगद्वारे प्राप्त महसूल आणि थकीत मुद्रांक शुल्क वसुलीचा मोठा वाटा आहे. कार्यालयातील पारदर्शक कामकाज, ऑनलाइन प्रणालीचा प्रभावी वापर आणि ई-फायलिंग प्रक्रियेमुळे दस्त नोंदणी सुलभ झाल्याने महसूल वाढीस मोठी गती मिळाली आहे. सक्षम नियोजन आणि नागरिकांना दिली जाणारी जलद सेवा यामुळे हे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणे शक्य झाले.हे यश संपादन करण्यासाठी अकोल्याचे सह जिल्हा निबंधक (वर्ग- १) किरण चौधरी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सह दुय्यम निबंधक कु. डी. डी. वर्गे व पातूर कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सातत्यपूर्ण परिश्रम घेतले.

# लोखंडी फायटरने हल्ला; किराणा दुकानदार जखमी

■मुर्तिजापुर,दि.५ (प्रतिनिधी)■

शहरातील स्टेशन विभागात किराणा दुकानदारावर लोखंडी फायटरने हल्ला करून जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फियार्दी मयुर शिवाजी सुपले (वय ३५, रा. तिडकेनगर, मूर्तिजापूर) १ एप्रिल रोजी सकाळी ९ ते १० वाजताच्या सुमारास आपल्या ह्यआशा प्रोव्हिजन या किराणा दुकानात नेहमीप्रमाणे काम करत होते. यावेळी आरोपी गोलु गणेश जाधव व विकी उर्फ रूशी प्रभाकर किर्दक (दोघेही रा. वडरपुरा, स्टेशन विभाग) हे दुकानासमोर आले. यावेळी गोलू जाधव याने हातातील लोखंडी फायटरने सुपले यांच्या छाती, मान व नाकावर वार करून त्यांना जखमी केले. तसेच विकी किर्दक याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

पुढे विकी याने खिशातून चाकू काढून वार करण्याचा प्रयत्न केला; मात्र फियार्दीच्या भावाने तत्परता दाखवत त्याला बाजूला ढकलल्याने मोठा अनर्थ टळला. दरम्यान, आरोपींनी शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकीही दिली. या प्रकरणी फियार्दीच्या तक्रारीवरून व वैद्यकीय अहवालाच्या आधारे पोस्टे मूर्तिजापूर शहर येथे कलम ११८(१),३५१ (३),३५२ बीएनएस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी शेख इरफान करीत आहेत.

# आडगांव बु येथे जम्मा जागरणाचे आयोजन

■अडगाव बु.,दि.५ (प्रतिनिधी)■

तेल्हारा तालुक्यातील अडगांव बु सालाबादप्रमाणे यंदाही रामदेव बाबा सेवा समिती च्या वतीने स्थानिक नवीन बालाजी मंदिरात विशाल जम्मा जागरण चे आयोजन करण्यात आले आहे..तमाम राजस्थानी लोकांचे आराध्य दैवत असलेल्या आणि या जगातून अस्पृश्यतेचा भेदभाव नष्ट करण्यासाठी सर्वप्रथम सामाजिक कार्याला सुरुवात करणारे राजस्थानचे लोकदैवत रामदेवबाबा यांच्या जिवन चरित्रावर स्थानिक रामदेवबाबा सेवा समिती, अडगाव बु शिवाजी नगर यांच्या वतीने भव्य जम्मा जागरणचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या १८ वर्षांपासून चालत आलेली परंपरा पुढे चालू ठेवत



यंदाही जालना येथील सुप्रसिद्ध जम्मा गायक

मनीष दायमा व शुभम दायमा बंधू आपल्या सुरेल आवाजाने भाविकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. या धार्मिक सोहळ्यात रामदेव बाबांची जन्म कथा,अखंड ज्योत, ब्यावले, संपूर्ण परचे आणि भजनांचा कार्यक्रम सादर केला जाईल आयोजित जम्मा जागरण सोहळा मंगळवार दिनांक ७ एप्रिल ला सायंकाळी ६ वाजल्यापासून स्थानिक नवीन बालाजी मंदिराच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे कार्यक्रमात परीसरातील तमाम भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन रामदेव बाबा सेवा समिती, सुंदरकांड सेवा समिती, राजस्थानी महिला मंडळ अडगाव बु शिवाजी नगर यांनी केले आहे.

# पाटील समाजाच्या 'योगायोग' पुस्तिकेचे प्रकाशन विविध उपक्रम राबविण्यावर भर देणार




■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

पाटील समाज अकोला तर्फे तयार करण्यात आलेल्या ' योगायोग ' या वधू वर परिचय पुस्तिकेचे प्रकाशन आज करण्यात आले. स्थानिक हॉटेल हर्षवर्धन येथे संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटील समाजाचे अध्यक्ष अशोकराव अमानकर होते. समाजाचे सचिव प्रदीप खाडे यांच्या संपादनाखाली तयार करण्यात आलेल्या या पुस्तिकेत सर्वच संवर्गातील उपवर मुला मुलींची कलर फोटोसह माहिती देण्यात आलेली आहे.

याप्रसंगी अशोकराव अमानकर, प्रदीप खाडे, सुनील जानोरकर, राजेंद्र मोहोकार, विनायकराव शेळके, शरद वानखडे , पाटील समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली बाहाकर, सचिव ॲड. दिपाली जानोरकर, संघटिका सरिता वाकोडे, अर्चना पाटील, अशोक पटोकार, देवराव हागे पाटील, सुभाष म्हैसणे, रामेश्वर सपकाळ, सुरेश गाढे पाटील डॉ. दिलीपराव मानकर, सुभाष पात्रीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

आगामी काळात महिलांच्या समस्या सोडविण्याकरिता एक विशेष कक्ष स्थापन करणे, तालुकास्तरीय कार्यकारिण्या तयार करून प्रत्येक तालुक्यात मेळाव्यांचे आयोजन करणे, समाजास फसविणाऱ्या बुवाबाजी पासून वाचविण्यासाठी प्रबोधन करणे, सकल मराठा समाजाचे एकत्रीकरण करणे, विवाह समारंभातील फाजील खर्च, ध्वनी प्रदूषण टाळण्यासह विवाह वेळेवरच लावण्याचा प्रयत्न करणे आधी उपक्रमांवर भर देण्याबाबत या कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास ' छावा ' संघटनेचे जिल्हाप्रमुख शंकरराव वाकोडे, अविनाश पाटील, संदीप महल्ले, पंकज जायले, रवींद्र वैराळे, गजानन हरणे, देवानंद ताले, वासुदेवराव कडू, गजाननराव इंगळे, देवेंद्र ताले, विनायकराव गावंडे, शिवानंद माळी, सागर अमानकर, निवृत्ती पारस्कर, दीपक आखरे, वसंतराव घनोकार, निलेश पवित्रकार, विठ्ठलराव गाढे, रघुनाथ राव खडसे, निरंजन पावसाळे, नमित भुईभार, गुणवंतराव जानोरकर, श्रीकृष्ण माळी, ओम अमानकर, रामभाऊ पाटील, मधुकर महल्ले, सुधाकर वानखडे, श्याम कुलट, शैलेंद्र काळे, वर्षा पोरे, मीनल गोंडचवर, वनमाला ठाकरे, विद्या गावंडे, प्रतिभा पाथरीकर, स्वप्नाली कुलट, रोहिणी घनोकार, किरण काळे, प्रतिभा वैराळे, संजय चौधरी, प्रा. विनायक धोरण, हिम्मतराव पोहरे, संजय फोकमारे, मधुकर पाटील, संतोष ठाकरे, अशोक आखरे, वसंत रोकडे, बाळकृष्ण काळे, गजानन उपाध्ये, मंगेश पाथरीकर, उकर्डा भुईभार, प्रमोद केणे, धनंजय बोरोकार, रामेश्वर माळी, समाधान झाडोकार, गणेशराव टिकार, विवेक काटोले, राजेश शिंदे, राजेश गोठखडे,एस. बी. सरोदे, प्रा. शरद राव गावंडे, अरुण कुलट, पुरुषोत्तम सुर्वे यांचे सह इतरही समाज बांधव भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन पाटील समाजाचे सचिव प्रदीप खाडे यांनी केले. योगायोग पुस्तिका अनंत मेडिकल स्टोअर्स रतनलाल प्लॉट अकोला व जानोरकर मंगल कार्यालय अकोलायेथे उपलब्ध आहे.

# वारकरी भूषण वै. गु.ह.भ.प.पांडुरंग महाराज पाटकर यांचा सुवर्ण पुण्यतिथी महोत्सव भक्तिभावात संपन्न

## संतविचारांची अखंड परंपरा आजही तेजोमय



■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

वारकरी संप्रदायाचे प्रख्यात प्रवर्तक, विदर्भाच्या संतपरंपरेतील तेजस्वी व्यक्तिमत्त्व आणि समाजप्रबोधनाचे अध्वर्यू वै. गु. ह. भ. प. पांडुरंग महाराज पाटकर यांच्या ५० व्या सुवर्ण पुण्यतिथी महोत्सवाचा सोहळा नीराट, वैराट व राजापूर परिसरात अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

पन्नास वर्षांचा कालावधी उलटूनही त्यांच्या संतविचारांची ङ्गसाखर पेरणीङ्घ आजही तितक्याच प्रभावीपणे सुरू असल्याचे या सोहळ्यातून अधोरेखित झाले.या निमित्ताने परिसरात विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हरिनाम सप्ताह, भजन, कीर्तन, प्रवचन, पालखी सोहळा, वारकरी दिंडी, महाप्रसाद आदी कार्यक्रमांत हजारो वारकरी व भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संपूर्ण परिसर 'ज्ञानोबा-तुकोबा'च्या गजराने दुमदुमून गेला होता.पांडुरंग महाराज पाटकर यांनी १९१८ ते १९७६ या कालखंडात अकोला, बुलढाणा आणि अमरावती जिल्ह्यात वारकरी संप्रदायाचा प्रचार-प्रसार करत समाजप्रबोधनाचे मोठे कार्य केले. त्या काळात वाहतुकीची साधने अत्यंत मर्यादित असताना त्यांनी पायी प्रवास करून गावोगावी कीर्तन-प्रवचनांच्या माध्यमातून संतांच्या अभंगातून लोकांना जागृत केले.

# मेलोडी ग्रुप प्रस्तुत 'वसंत बहार' सुरांच्या मैफिलीने जिंकली रसिकांची मने

■अकोट,दि.५ (प्रतिनिधी)■

सांस्कृतिक व संगीत क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवणाऱ्या तसेच नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या मेलोडी ग्रुप, अकोट प्रस्तुत 'वसंत बहार' या सुरांच्या मैफिलीने रसिकांची मने जिंकली.या मैफिलीत अनेक सदाबहार हिंदी व मराठी गीते सादर करण्यात आली. 'हुस्न पहाडों का','एक तेरे ही चेहरे पर', 'प्रियतमा प्रियतमा','घुंगट की आड से','हृदयी वसंत फुलताना' यांसारख्या गाण्यांनी वातावरण भारावून गेले.विशेषतः फिमेल सिंगर हेमा जोशी (अकोला) यांच्या मधुर व सुरेल आवाजाने उपस्थित प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.हा कार्यक्रम दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी नंदुभाऊ शेगोकार यांच्या शेतकरी मोटर्स, दर्यापूर रोड, अकोट येथे उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाचे बहारदार व रंगतदार सूत्रसंचालन सुप्रसिद्ध अँकर प्रविण पुंडगे यांनी केले.कार्यक्रमाच्या




यशस्वीतेसाठी मेलोडी ग्रुपचे अध्यक्ष योगेश वर्मा,सचिव भास्करराव वानखडे, नंदुभाऊ शेगोकार, हिम्मत दंदी, कोषाध्यक्ष अरुण सांगळूदकर तसेच व्यवस्थापक कैलास बोरकुटे यांनी विशेष परिश्रम घेतले.या प्रसंगी नंदुभाऊ शेगोकार, संदिप ढोक,मिलिंद तेलगोटे, पवन पातूरकर,ओमप्रकाश डेबला ,अनंत काळे,विजय भोरे,सुनिल धुळे,आदित्य गुप्ता, किरण गुहे,योगेश वर्मा,दीपक तळोकार,स्वप्नील आढे,भास्कर वानखडे,मोहन सपकाळ, कन्हैया गौर,डॉ. विशाल इंगोले,आशिष बारबदे,गजानन तायडे,श्याम राऊत,हिम्मत दंदी, कैलास बोरकुटे,आनंद भोरे, अरुण सांगळूदकर,प्रताप सोळंके,दिगंबर वणारे या गायकांनी आपल्या सुमधुर आवाजात गीते सादर केली.कार्यक्रमास रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत संपूर्ण वातावरण सुरमय केले.

# बौद्ध समाज वधू-वर सूचक पुस्तिकेचे प्रकाशन

■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

स्थानिक अशोक वाटिका येथे भारतीय बौद्ध महासभेचे महासचिव नंदकुमार डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली बौद्ध समाज वधू-वर सूचक पुस्तिकेचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून वंचित बहुजन आघाडीच्या केंद्रीय सदस्या अरुंधतीताई सिरसाट, जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, मिलिंद इंगळे, प्रभाताई शिरसाट आणि संगीताताई अढाऊ यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी बाळापूर तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत, वधू-वर सूचक पुस्तिका ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला नगरसेवक शेख शमशू, ॲड. सुबोध डोंगरे, बाबाराव बागडे यांच्यासह वंचित बहुजन आघाडी व भारतीय बौद्ध महासभेचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम समाजबांधवांसाठी अत्यंत उपयुकब ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# जिल्हाधिकारी वर्षा मीना यांची सूर्योदय बालगृहाला सदिच्छा भेट



■अकोला,दि.५ (प्रतिनिधी)■

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी बुधवारी सूर्योदय बालगृहाला सदिच्छा भेट देऊन प्रवेशित बालकांसोबत संवाद साधला.जिल्हाधिका-यांनी बालगृहाची पाहणी करून संस्थेच्या कार्याची माहिती जाणून घेतली, संस्था करीत असलेल्या बालकांची विशेष काळजी व संरक्षणाच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. श्री.भय्युजी महाराज यांच्या या संस्थेमार्फत सुरु असलेल्या इतर कार्याची माहिती त्यांनी जाणून घेतली.जिल्हाधिका-यांच्या उपस्थितीत यावेळी प्रवेशित बालकांना मिठाई व खेळ साहित्याचे वाटपही झाले. सोलापूर येथील राज्यस्तरीय चाचा नेहरू बाल महोत्सवासाठी निवड झालेल्या बालकांशी संवाद साधून त्यांनी प्राप्त घवघवीत यशाबद्दल बालकांचे मनापासून कौतुकही केले. संस्थेतील कर्मचारी वर्गासोबत संवादही साधला..

RNINO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak Local Editor - Purushottam Madhukarrao Dhole. Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9822970023

आर.एन.आय. नोंदणी क्र. ४६९७३/१९८६ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर दुर्गा चौक, अकोला येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक, स्थानिक संपादक : पुरुषोत्तम मधुकरराव ढोले. फोन: ९८८१४८९४७९ (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील)